निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....

दैनिक निशस्त्र योध्दा LIVE

मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com

मेहकर | गुरूवार । ३० एप्रिल २०२६ । वर्ष-पहिले । अंक क्र. ४३ । पृष्ठे-४ । किंमत-४ रू. | बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द

दिनविशेष

३० एप्रिल

अंतरराष्ट्रीय

१९४५ - ॲडॉल्फ हिटलरची आत्महत्या.
२००६ - चीनमध्ये कोळसा खाणीतील स्फोटात २४ कामगार ठार झाले.

राष्ट्रीय

२००८ - सुप्रसिद्ध गायक महेंद्र कपूर यांना दादासाहेब फाळके अकादमीच्या गोल्डन वॉयस पुरस्काराने गौरविण्यात आले.

जन्म

१८७० - धुंडिराज गोविंद तथा दादासाहेब फाळकेयांचा जन्म.

बुलढाण्याच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला 'राजमाता जिजाऊ' यांचे नाव, शासन निर्णय निर्गमित

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

बुलढाणा/प्रतिनिधी : बुलढाण्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या महाविद्यालयाचे आता राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बुलढाणा असं नामकरण करण्यात आलं आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विंभागाने शासन निर्णय निर्गमित करून नामकरणाला मान्यता दिली आहे. १०० विद्यार्थी क्षमतेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असून त्यास संलग्नित ४३० खाटांचं रुग्णालय आहे.

राजमाता जिजाऊंच जन्मस्थान बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा असल्याने शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाला हे नाव देण्यात आलं आहे. या नव्याने स्थापन होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला आता एका प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे नाव देण्यात आले आहे. राजमाता जिजाऊ, ज्यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री होत्या. त्यांचे जीवन राष्ट्रप्रेम, त्याग, शौर्य आणि लोककल्याणाच्या उच्च आदर्शानी परिपूर्ण होते. त्यांच्या दूरदृष्टी, संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व आणि दृढ नेतृत्वाच्या बळावर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा दिली. समाजमनात त्यांचे स्थान अत्यंत पूजनीय असून, त्या स्त्रीशक्तीचे प्रेरणास्थान मानल्या जातात. त्यांच्या कार्यामुळे समाजात नैतिक मूल्ये, कर्तव्यनिष्ठा आणि जनकल्याणाची भावना दृढ झाली आहे. या निर्णयामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला आहे. 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय' हे केवळ एक शिक्षण केंद्र न राहता, ते आरोग्य सेवेचे एक प्रेरणास्थान बनेल आणि जिल्ह्याच्या विकासात मोलाचे योगदान देईल अशी आशा आहे.

राजमाता जिजाऊ यांच्या महान कार्याचा गौरव म्हणून, बुलढाणा येथील शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाचे नामाभिधान 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा' असे करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. हा निर्णय केवळ एका इमारतीला नाव देण्यापुरता मर्यादित नाही, तर तो राजमाता जिजाऊंच्या आदर्शाना आणि त्यांच्या दूरदृष्टीला आदरांजली वाहणारा आहे. या नामाभिधानामुळे या महाविद्यालयातून शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि येथे सेवा देणारे वैद्यकीय कर्मचारी यांना राजमाता जिजाऊंच्या त्याग, कर्तव्यनिष्ठा आणि लोककल्याणाच्या भावनेतून प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा आहे. या निर्णयामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला आहे. 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय' हे केवळ एक शिक्षण केंद्र न राहता, ते आरोग्य सेवेचे एक प्रेरणास्थान बनेल आणि जिल्ह्याच्या विकासात मोलाचे योगदान देईल अशी आशा आहे.

Short न्यूज

महाराष्ट्राच्या 'एआय पॉलिसी'ला मंजुरी; १.५ लाख रोजगार, ५०० कोटींच्या निधीची घोषणा

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात महाराष्ट्राने मोठे पाऊल टाकत राज्य मंत्रिमंडळानं बुधवारी 'महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणा'ला मंजुरी दिली. या धोरणाच्या माध्यमातून राज्यात १.५ लाख एआय आधारित रोजगारनिर्मिती, २ लाख युवकांना प्रशिक्षण, तसेच एआय स्टार्टअप्स आणि उद्योगांना चालना देण्यावर भर देण्यात आला आहे.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे मंत्री आशिष शेलार यांनी ही माहिती दिली. ''तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील बदल झपाट्याने होत आहेत. महाराष्ट्राने या बदलांसाठी सज्ज राहून ते आत्मसात करणे गरजेचे आहे. त्याच दृष्टीने आज महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाला मंजुरी देण्यात आली,'' असं शेलार यांनी सांगितलं. या धोरणाचा मुख्य उद्देश राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणे हा असून, सुमारे १.५ लाख एआय आधारित रोजगार निर्माण करण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलं आहे. भविष्यातील कौशल्यपूर्ण मनुष्यबळ तयार करण्यासाठी २ लाख युवकांना एआय विषयातील प्रशिक्षण दिले जाणार आहे. एआय आधारित स्टार्टअप्स आणि युनिकॉर्न निर्माण करण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा व्हेंचर कॅपिटल फंड उभारण्यात येणार आहे. त्यापैकी २५० कोटी रुपये राज्य सरकारकडून दिले जाणार आहेत. याशिवाय एआय आधारित उद्योगांना यंत्रसामग्री खरेदीसाठी अनुदान दिले जाईल.

धीरेंद्र शास्त्रींचा पुन्हा चमत्काराचा वादग्रस्त दावा; १०० दिवस व्हेंटिलेटरवर असलेल्या मुलाचा जीव वाचवला; डॉक्टरांवर प्रश्नचिन्ह

नागपूर : नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या रामकथेचा कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमात त्यांनी 'दिव्य दरबार' म्हणजेच असाध्य रोगांवर चमत्काराने उपचार केल्याचा दावा केला आहे. एका लहान मुलावर शंभर दिवस व्हेंटिलेटरवर असताना उपचार केल्याचाही दावा त्यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकारानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आक्षेप घेतला आहे. या मुलावर डॉक्टरांनी उपचार केले असताना हा चमत्कार कसा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर धीरेंद्र शास्त्री यांनी कथेदरम्यान सांगितले की, बालाची भक्ती केल्याने आणि हनुमानजी यांचा आशिर्वाद मिळाल्याने मुलाचा जीव वाचला आहे.

ममता बॅनर्जींना जबर धक्का? बंगालमध्ये यंदा भाजपाची सत्ता?

कोलकाता/ वृत्तसंस्था : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात आज मोठ्या उत्साहात मतदान पार पडले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ८९.९९ टक्के मतदानाची नोंद झाली असून, पहिल्या टप्प्याप्रमाणेच दुसऱ्या टप्प्यातही मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. याआधी झालेल्या पहिल्या टप्प्यात १५२ जागांसाठी तब्बल ९१ टक्के विक्रमी मतदान झाले होते. त्यामुळे सलग दुसऱ्या टप्प्यातही जवळपास ९० टक्क्यांच्या आसपास मतदान झाल्याने राज्यातील निवडणुकीची रंगत अधिकच वाढली आहे.

राज्यातील राजकीय वातावरण आधीपासूनच तापलेले असून, या टप्प्याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. दरम्यान, विविध एक्झिट पोल्सनुसार यंदा पश्चिम बंगालमध्ये सत्तांतर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही सर्वेक्षणांनुसार भाजपला १५० ते १६० जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, तृणमूल काँग्रेसला १३० ते १४० जागांपर्यंत मर्यादित राहावे लागू शकते, असेही भाकीत करण्यात आले आहे.

तथापि, पश्चिम बंगालमध्ये नेहमीच अनपेक्षित निकाल लागण्याची परंपरा पाहायला मिळते, त्यामुळे प्रत्यक्ष निकालात उलटफेर होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. २०११ पासून राज्यात सत्तेवर असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारसमोर यंदा मोठे आव्हान उभे ठाकले आहे. मागील निवडणुकीत भाजपला ७७ जागा मिळाल्या होत्या, तर यावेळी त्यांच्या जागांमध्ये मोठी वाढ होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या पार्श्वभूमीवर, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा गड कायम राहणार की सत्तांतर होणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. निकाल जाहीर झाल्यानंतरच राज्यातील सत्तेचे समीकरण स्पष्ट होणार आहे.

ममता बॅनर्जी यांचा २० हजार मतांनी पराभव होणार! सुवेंदू अधिकारी यांचा दावा; भाजपला किती जागा मिळणार? केली मोठी भविष्यवाणी

कोलकाता/ वृत्तसंस्था : संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आज थांबली. आज येथे दुसऱ्या टप्प्यात १४२ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. यापूर्वी, २३ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यात १५२ जागांवर मतदान झाले होते. महत्वाचे म्हणजे, किरकोळ घटना वगळता, यावेळी येथे हिंसाचार दिसून आला नाही. लोक उत्साहाने मतदानासाठी घराबाहेर पडले आणि त्यांनी विक्रमी मतदान केले. निवडणूक आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार, दुसऱ्या टप्प्यात ९१ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. यानंतर आता, भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांनी भवानीपूर मतदारसंघातून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा २० हजार मतांच्या फरकाने पराभव होईल, असा दावा केला आहे. तसेच भाजपला किती जागा मिळतील? यासंदर्भातही मोठी भविष्यवाणी केली आहे.

मतदानानंतर प्रतिक्रिया देताना सुवेंदू अधिकारी म्हणाले, राज्यातील जनतेने परिवर्तनासाठी मतदान केले आहे. हिंदू मतदारांनी पहिल्यांदाच उघडपणे बाहेर पडत मतदान केले आणि आपला मतदानाचा हक्क बजावला. ममता बॅनर्जी यांनी दिवसभर केंद्रीय सुरक्षा दलांना घाबरवण्याचा प्रयत्न केला. गुजराती-मारवाडी वस्तीत गुंडांच्या मदतीने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला.

एवढेच नाही तर, भवानीपूरमध्ये आपण २० हजार मतांनी जिंकत आहोत ८ पैकी ७ वॉर्डांत आपली आघाडी असेल आणि भाजप १८० पेक्षा जास्त जागा जिंकून सरकार स्थापन करेल, असे भाकितही त्यांनी केले. पश्चिम बंगाल निवडणुकीसंदर्भात बोलताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य म्हणाले, बंगालच्या जनतेने अशी निवडणूक कधीच बघितली नाही. ते अतिशय उत्साहाने या निवडणुकीत सहभागी झाले होते. ही निवडणूक कुणाला मुख्यमंत्री बनवण्यासाठी, कुण्या पक्षाला सत्तेबाहेर करण्यासाठी अथवा कुण्या पक्षाला सत्तेवर आणण्यासाठी नव्हती, तर ही निवडणूक बंगालला 'पश्चिम बांगलादेश' होण्यापासून रोखण्यासाठी होती.

अशोक खरात प्रकरण; ४० दिवसानंतर सुद्धा खरातच्या गुंगीकारक औषधाचे गूढ कायम

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

नाशिक/प्रतिनिधी : महिला लैंगिक अत्याचार प्रकरणी अटकेत असलेला भोंदूबाबा अशोक खरात हा पीडित महिलांना देत असलेल्या गुंगीकारक औषधाचं गूढ अद्यापही कायम आहे. गेल्या ४० दिवसापासून भोंदूबाबा खरात एसआयटीच्या ताब्यात आहे. अशोक खरात महिलांना देत असलेले औषध कोणते आणि ते तो कुठून मागवत होता? याबाबत गूढ अद्यापही कायम आहे.

४० दिवस उलटूनसुद्धा पोलिसांच्या हाती ठोस पुरावे नाही : भोंदूबाबा अशोक खरातविरोधात १७ मार्च रोजी एका म हिलेने लैंगिक शोषणाचा आरोप केल्यानंतर नाशिकच्या सरकारवाडा पोलिसांनी त्याला १८ मार्च रोजी अटक केली. त्याच्याविरोधात बलात्कार, फसवणुकीचा आणि अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर अनेक पीडित महिला धाडसाने पुढे येत त्यांनी खरात विरोधात गुन्हे दाखल केले. भोंदूबाबा खरातने महिलांना गुंगीकारक औषध दिल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे एसआयटीने हे गुंगीकारक औषध शोधण्यासाठी शहरातील दोन डॉक्टरांची चौकशी केली होती. खरातच्या नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नर येथील ओकस प्रॉपर्टी कार्यालयातून औषधाची एक रिकामी बाटली ताब्यात घेतली होती. खरातने दिलेले पाणी पिल्यावर चक्कर येणे, मळमळ होणे आणि ते पिल्यावर स्वत:ची शुद्ध हरपणे अशा तक्रारी पीडित महिलांनी केल्या होत्या. न्यायालयाच्या प्रत्येक सुनावणीत गुंगीकारक औषधाचा तपास करणं बाकी असल्याचे सांगत एसआयटी पथकानं खरातला पोलीस कोठडी मि ळावी अशी विनंती न्यायालयात केली. मात्र ४० दिवस उलटून सुद्धा पोलिसांच्या हाती ठोस पुरावे लागले नाहीत.

पाणी पिल्यावर महिला खरातच्या तालावर नाचायच्या : पीडित महिलांना देत असलेले पाणी पिल्यानंतर महिला भोंदूबाबा खरातच्या तालावर नाचत असे, असे महिलांनी तक्रारीत म्हटलंय. महिलांना गुंगीकारक पदार्थ पाजून त्यांच्यावर अत्याचार करत असल्याचं आतापर्यंतच्या एटीएसच्या तपासात समोर आले आहे. तो नक्की कोणतं द्रव्य पाजायचा ते मळकट रंगाचे आणि चवीला बरोबर नसलेले द्रव्य काय होते? आणि तो ते कोठून आणायचा? याचा शोध सलग सातव्या गुन्ह्यातही पोलिसांना लागलेला नाही. फॉरेन्सिक टीमने खरातच्या कार्यालयातून औषधाची एक बाटली जप्त केली होती. खरात विरोधात सरकारवाडा पोलीस ठाण्यात एकूण १२ गुन्हे दाखल असून त्यातील आठ गुन्हे महिला लैंगिक शोषणाची आहेत.

सातव्या गुन्ह्यात खरातला न्यायालयीन कोठडी : महिला लैंगिक अत्याचाराच्या सातव्या गुन्ह्यात भोंदूबाबा अशोक खरातची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली. महिला अत्याचाराच्या आठव्या गुन्ह्यात त्याला ताब्यात घेण्यासाठी एसआयटी पथकाने न्यायालयात अर्ज दाखल केलाय. त्यामुळे आता आठव्या गुन्ह्यात खरातला अटक करण्यात येणार असून त्याला उद्या (३० एप्रिल) पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे.

महिला आरक्षण विधेयकासाठी महायुती सरकार मैदानात, घेतला मोठा निर्णय

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

मुंबई/प्रतिनिधी : महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी महायुती सरकार आता मैदानात उतरले आहे. लवकरच महायुती सरकार महिला आरक्षण विधेयकासाठी मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आल्याची माहिती समोर आली आहे. आरक्षण विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी महायुती सरकार एक दिवसीय विशेष अधिवेशन घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.

या प्रस्तावित अधिवेशनाद्वारे केवळ राज्यातीलच नव्हे, तर देशभरातील म हिलांसाठी सकारात्मक संदेश देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे. महिला आरक्षणासाठी घेण्यात येणारं हे एक दिवसीय विशेष अधिवेशन मे महिन्यात पार पडणार आहे. मात्र असं असलं तरी ते नेमकं कधी होणार याच्या तारखे संदर्भात अद्याप स्पष्टता नाही. पण लवकरच ती तारीख जाहीर होईल. तर महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर ठोस भूमिका मांडण्यासाठी सर्वपक्षीय आम दारांना या विशेष अधिवेशनात सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.

महिला आरक्षण अधिनियमाशी संबंधित घटना (१३१वे) दुरुस्ती विधेयक २०२६, डिलिमिटेशन विधेयक २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायदा (दुरुस्ती) विधेयक २०२६ यावर गेल्या आठवड्यात संसदेत चर्चा झाली. यानंतर १३१व्या संविधान दुरुस्तीवर चर्चेनंतर विधेयकावर मतदान घेण्यात आलं. मात्र हे विधयक मंजूर झालं नाही. त्यानंतर सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारी शक्ती वंदन अधिनियम दुरुस्ती विधेयक आणि विरोधकांच्या भूमिकेवर सविस्तर भाष्य केलं. आम्ही अजूनही हार मानलेली नाही. भविष्यात महिलांना आरक्षण देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत राहू, असं मोदी यावेळी म्हणाले.

विरोधकांनी सरड्यासारखे रंग बदलले - देवेंद्र फडणवीस

तर लोकसभेत महिला आरक्षण नामंजूर झाल्यानंतर महाराष्ट्रातही महायुती सरकारने या विधेयकाच्या बाजून भूमिका घेत विरोधकांवर हल्ला चढवला होता. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत अनेक मुद्दे मांडले. विरोधकांनी महिला विरोधातील मानसिकता दाखवली. त्यांनी ७० कोटी महिलांचा विश्वासघात केला अशी टीका फडणवीस यांनी केली होती. विरोधकांनी सरड्यासारखे रंग बदलले, त्यांनी नारीशक्तीचा मोठा अपमान केला आहे, अशा शब्दांत फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली. दरम्यान, आता राज्य सरकारने महिलांसाठी विशेष भूमिका घेतली असून त्यासाठीच हे एकदिवसीय विशेष अधिवेशन घेण्यात येणार असल्याचं समजतंय. त्यामुळे महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर राजकीय हालचालींना वेग आला असून, या अधिवेशनाकडे राज्यासह देशाचेही लक्ष लागले आहे.

धुळे-भुसावळ एसटीचा भीषण अपघात; ३ किमीपर्यंत प्रवाशांचा किंकाळ्यांचा आवाज

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

जळगाव/प्रतिनिधी : धुळ्याहून भुसावळकडे जाणाऱ्या एका एसटी बसला भीषण अपघात झाला असून, काळजाचा थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. बसचे ब्रेक फेल झाल्याने सुमारे ३ किलोमीटरपर्यंत अनियंत्रित बस रस्त्यावर धावत होती. या दरम्यान बसमधील ५० ते ६० प्रवाशांचा जीव टांगणीला लागला होता. सुदैवाने, बस सुरक्षा कठड्याला धडकल्याने मोठी जीवितहानी टळली असली तरी १५ प्रवासी जखमी झाले आहेत.

नेमकं काय घडलं?

प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, बस पारोळा येथून निघाल्यानंतर एरंडोलजवळील धारागीर गावाजवळ पोहोचण्यापूर्वीच गाडीच्या मागील बाजूने मोठा 'खळखळ' आवाज येत होता. काही वेळातच चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि समजले की बसचे ब्रेक फेल झाले आहेत. अनियंत्रित झालेली बस कधी रस्त्यावर तर कधी रस्त्याखाली जात होती. ही थरारक स्थिती सुमारे ३ किलोमीटरपर्यंत सुरू होती, ज्यामध्ये जीव वाचवण्यासाठी प्रवाशांनी एकच आरडाओरडा केला.

बस अनियंत्रित असतानाच तिची काही चाके निखळल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अखेर बस रस्त्यालगतच्या सुरक्षा कठड्याला जाऊन धडकली. या भीषण धडकेत बसचा चालक आणि वाहक (कंडक्टर) गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने धुळे येथे हलवण्यात आले आहे.

अपघातात जखमी झालेल्या १० ते १५ प्रवाशांना जळगावच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बहुतांश प्रवाशांना मुका मार लागला असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. एसटी महामंडळाकडून या तांत्रिक बिघाडाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, मात्र प्रवाशांनी बसच्या देखभालीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

महाराष्ट्र होरपळून निघतोय...

फेब्रुवारी ते मे हे चार महिने उन्हाळ्याचे म्हणून ओळखले जातात. हवामानातील चढउतारामुळे तुलनेत फेब्रुवारी व मार्च सुसह्या गेले. परंतु, यंदाचा एप्रिल सर्वार्थाने तापदायक असल्याचा अनुभव देशातील नागरिक घेताना दिसतात. उत्तर भारताची अवस्था सध्या भटारखान्यासारखी झाली असून, उष्णतेच्या लाटांमुळे येथील जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाड्याला दरवर्षीच उष्णतेच्या लाटांचे तडाखे बसतात. परंतु, यंदा अर्धा अधिक महाराष्ट्र उष्णतामानात होरपळून निघत असल्याचे चित्र आहे. राज्यातील जवळपास २२ शहरांमधील तापमानाचा पारा चाळीशीपार जावा, यातूनच सध्याचा प्रकोप कसा असावा, याचा अंदाज येतो. महाराष्ट्रासह काही राज्यांमध्ये उष्माघाताने बळी गेल्याचीही उदाहरणे समोर आली आहेत. हे पाहता सर्वांनाच तब्येतीची अधिकची काळजी घ्यावी लागेल. आरोग्य विभागाने उन्हापासून संरक्षण करणे वा पुरेसे पाणी पिण्यासह दिलेल्या अन्य गाईडलाईन्सचे प्राप्त परिस्थितीत पालन करणे प्रत्येक नागरिकाच्या हिताचे असेल. उष्णतेच्या लाटांसंदर्भात संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना म्हणजे एएफओ आणि जागतिक हवामान संघटनेने प्रसृत केलेला अहवाल तर अतिशय महत्त्वाचा आहे. उष्णतेच्या लाटांमुळे भारतीय शेतीसह जगभराचे मोठे नुकसान झाल्याचे चित्र आहे. अतिउष्णतेमुळे संपूर्ण कृषीव्यवस्थाच विस्कळीत वा बाधित होऊ शकते, अशी भीतीही या अहवालातून व्यक्त करण्यात आली आहे. भारतातील ६० टक्के जनता आजही शेती व शेतीपूरक उद्योगांवर अवलंबून आहे. परंतु, अति उष्णतामानामुळे शेतीपुढे अनेक आव्हाने उभी राहिलेली दिसतात. २०२२ मध्ये गव्हाच्या उत्पादनात झालेली ९ ते ३४ टक्क्यांची घट, दुग्धोत्पादनातील १५ टक्क्यांपर्यंतची घट, टोमॅटो, फ्लॉवरपासून अगदी आंब्यासारख्या बागायती पिकांना बसलेला फटका, कोंबड्यांच्या मृत्यूदरात झालेली वाढ या सगळ्याला उष्णतेच्या लाटा कारणीभूत ठरल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही अत्यंत चिंताजनक बाब ठरते. उष्णतेमुळे बाष्पीभवन वाढून जमिनीतील कोरडेपणा वाढतो. परिणामी अवर्षणाची शक्यता वाढते. तापमानवाढीचा धोका, एल निनोची चाहूल व बदलत्या हवामानाचा विचार करता भारतीय शेतीला आगामी काळात मोठ्या दुष्टचक्रातून जावे लागण्याची चिन्हे आहेत. एकतर शेती हा जोखमीचा व्यवसाय असल्याने आधीच अनेक जण त्यातून बाहेर पडले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, वातावरणीय स्थितीमुळे देशातील शेती कामगारांची कार्यक्षमता या शतकाच्या अखेरीस ४० टक्क्यांपेक्षा कमी होऊ शकते. याशिवाय उष्णता व आर्द्रतेच्या संयुक्त परिणामांमुळे कामगारांच्या सुरक्षेसोबतच मजुरांच्या टंचाईलाही सामोरे जावे लागेल, हा यातून देण्यात आलेला इशाराही गंभीर म्हणता येईल. म्हणूनच शेती-मातीची संस्कृती व कृषी अर्थव्यवस्था टिकविण्यासाठी परिस्थितीनुरूप बदलावे लागेल. त्याला अनुसरून एएफओने उष्णतापूरक बियाणे, सूक्ष्म सिंचन, पाणी बचत तंत्रज्ञान, हवामान अंदाजानुसार कार्यवाही, शेत मजुरांकरिता सुरक्षित कामाची व्यवस्था, पशुधनासाठी योग्य सावली व थंडावा, हवामान बदलांशी शेतीला जुळवून घेण्याकरिता स्थानिक नियोजन यांसारख्या महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. त्या अंमलात आणण्याच्या दृष्टीने आतापासून प्रयत्न झाले, तरच आपला टिकाव लागेल. सध्याचे जागतिक तापमान सुमारे १.४८ अंशांनी जास्त आहे. वाढीचा हा वेग अभूतपूर्वच. त्यामुळे पॅरिस हवामान परिषदेत ठरल्याप्रमाणे कार्बन उत्सर्जन कमी करण्याकरिता सर्व देशांना सामूहिक प्रयत्न करावे लागतील. अर्थात त्याकरिता सर्वप्रथम युद्धाच्या मानसिकतेतून बाहेर पडून पृथ्वीच्या हवामानाचा प्राधान्याने विचार करावा लागेल.

महाराष्ट्र राज्य वर्धापन दिनाच्या मुख्य शासकीय समारंभाची रंगीत तालीम

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर शुक्रवार, १ मे २०२६ रोजी मुख्य शासकीय समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची रंगीत तालीम याच मैदानावर घेण्यात आली. यावेळी ध्वजवंदन राजशिष्टाचार विभागाचे उपसचिव चंद्रकांत मोरे यांनी केले. राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत आणि राज्यगीताने ध्वजाला सलामी देण्यात आली.

शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी गृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर पांडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात २६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या प्रजासत्ताक दिन समारोहात उत्कृष्ट संचलन केलेल्या पथकांना अपर पोलीस महासंचालक मधुकर पांडे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यामध्ये सशस्त्र दल, नि:शस्त्र दल आणि शालेय पथकास पारितोषिक देण्यात आले. सशस्त्र दलांमध्ये प्रथम पारितोषिक राज्य राखीव पोलीस पथक, द्वितीय पारितोषिक बृहन्मुंबई पोलीस सशस्त्र पुरुष पथक आणि तृतीय पारितोषिक संयुक्तपणे बृहन्मुंबई दंगल नियंत्रण पथक, गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याचे सी ६० पथक यांनी पटकाविला. निःशस्त्र दलांमध्ये प्रथम पुरस्कार मुंबई अग्निशमन दल, द्वितीय पुरस्कार सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, तृतीय क्रमांक राज्य उत्पादन शुल्क यांनी पटकाविला.

या संचलनामध्ये शालेय पथके सहभागी झाली होती. शालेय पथकांमध्ये प्रथम पुरस्कार रोड सेफ्टी पेट्रोल मुलींच्या रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहिसर यांच्या पथकास, द्वितीय पुरस्कार रोड सेफ्टी पेट्रोल मुलांच्या डॉ. ॲन्टोनियो डा सिल्वा हायस्कूल, दादर यांच्या पथकास आणि तृतीय पुरस्कार रोड सेफ्टी पेट्रोल मुले सेंट पॉल हायस्कूल, दादर यांच्या

पथकाने पटकाविला.

याशिवाय केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या वतीने शासकीय शाळांमधील आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांना सशस्त्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरण अंतर्गत स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम राबविण्यात येत आहे. यामध्ये शासकीय व बृहन्मुंबई महापालिकेच्या २४४ शाळांमध्ये हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे.२०२५ - २६ या शैक्षणिक वर्षामध्ये पोलीस कॅडेट प्रोग्रॅम अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या शाळांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये प्रथम पुरस्कार मराठी मुंबई पब्लिक स्कूल, विलेपार्ले (पश्चिम), द्वितीय पुरस्कार एस.एस.एस मल्टीपर्पज टेक्निकल हायस्कूल मुंबई आणि तृतीय पुरस्कार अंजुमन आय इस्लाम बद्रुद्दिन तैयबजी हायस्कूल मुंबई यांनी पटकाविला.

यानंतर राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई सशस्त्र पोलीस दल, बृहन्मुंबई दंगल नियंत्रण पथक, बृहन्मुंबई सशस्त्र महिला पोलीस दल, निशाण टोळी (महाराष्ट्र पोलीस ध्वज, बृहन्मुंबई पोलीस ध्वज, राज्य राखीव पोलीस बल ध्वज, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय ध्वज, बृहन्मुंबई अग्निशमन दल ध्वज, गृहरक्षक दल ध्वज), मुंबई लोहमार्ग पोलीस दल, मुंबईत पुरुष पोलीस दल, बृहन्मुंबई वाहतूक पोलीस दल, गृहरक्षक दल महिला पथक, मुंबई अग्निशमन दल,मुंबई महापालिका सुरक्षा रक्षक दल, सुरक्षा सुरक्षा मंडळ दल मुंबई आणि ठाणे जिल्हा, पाईप बँड पथक, बृहन्मुंबई पोलिस महिला पाईप बँड पथक, ब्रास बँड पथक, अश्व दल पोलीस पथक, महिला निर्भया पथक यांनी मानवंदना दिली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानी जोशी आणि पल्लवी मुजुमदार यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य

दि. ३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना अध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.

तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतः पासून सुरुवात करावी लागते. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वच्छतेला सामाजिक जबाबदारीचे रूप दिले.

तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.

तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

तुकडोजी महाराजांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला एक वेगळा अर्थ दिला. त्यांनी ग्रामस्वराज्याला केवळ राजकीय स्वायत्तता म्हणून न पाहता, ते सामाजिक आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक मानले. त्यांनी गावांनी बाह्य अवलंबित्व कमी करून स्वतःच्या संसाधनांचा योग्य वापर करावा, स्थानिक कौशल्यांचा विकास करावा आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्यात युवकांच्या भूमिकेला विशेष स्थान होते. त्यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे मुख्य घटक मानले. त्यांनी युवकांना केवळ शिक्षण घेण्यापुरते मर्यादित न राहता, समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये आणि प्रवचनांमध्ये युवकांना प्रेरणा देणारे संदेश असत. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवन, शिस्तबद्ध वर्तन आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली.

तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.

भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कार्यातून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा, स्वावलंबनाचा, स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तुकडोजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करताना असे जाणवते की, त्यांनी समाजाला दिलेले संदेश हे केवळ त्या काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश, समतेचा विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांच्या कार्यातून आपण शिकू शकतो की, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृती आवश्यक असते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.

शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या ग्रामगीतेतील विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी परिपूर्ण समाज निर्माण करू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.

डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

सुपर एल निनो: २०२६ चा उन्हाळा आणि उष्माघाताचे संकट वेळीच व्हा सावध!

निसर्गाचे चक्र बदलत असून यंदा उन्हाळ्याने रौद्र रूप धारण करण्यास सुरुवात केली आहे. राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा चाळीशी पार गेला असून, सूर्याच्या प्रखर किरणांमुळे नागरिक होरपळून निघत आहेत. हवामान तज्ज्ञांच्या मते, २०२६ हे वर्ष भारताच्या हवामान इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. या भीषण परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाने हीट वेव्हचा (उष्णतेची लाट) इशारा दिला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

जागतिक हवामान बदलामध्ये सुपर एल निनो ही घटना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. समुद्र सपाटीचे तापमान वाढल्यामुळे जगभरातील हवामानावर याचे विपरीत परिणाम होतात. यामुळे भारतात मान्सूनवर परिणाम होण्याची आणि उन्हाळ्याची तीव्रता कमालीची वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अनेक राज्यांत तापमान ४५सेल्सीअस वर जाण्याचे संकेत आहेत.

भारतीय हवामान विभागाच्या मानकानुसार किनारी प्रदेशासाठी: सलग दोन दिवस कमाल तापमान ३७सेल्सीअस पेक्षा जास्त राहिल्यास. जेव्हा तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा ४.५सेल्सीअस ते ६.४सेल्सीअस ने वाढते, तेव्हा त्याला उष्णतेची लाट म्हणतात. : जेव्हा तापमान सरासरीपेक्षा ६.५सेल्सीअस पेक्षा जास्त वाढते, तेव्हा अतिउष्ण लाट ही स्थिती जीवघेणी ठरू शकते.

उष्माघाताची लक्षणे: वेळीच ओळखा धोका

उष्माघात ही केवळ थकव्याची अवस्था नसून ती एक वैद्यकीय आणीबाणी आहे. खालील लक्षणे दिसताच सावध व्हावे:

१. शरीराचे तापमान कमालीचे वाढणे पण घाम न येणे.

२. चक्कर येणे, डोकेदुखी किंवा मळमळणे.

३. त्वचा कोरडी आणि लाल होणे.

४. तीव्र तहान लागणे आणि लघवीचे प्रमाण कमी होणे.

५. लहान मुलांमध्ये प्रचंड चिडचिड आणि सुस्ती येणे.

उष्णतेपासून बचावासाठी हे करा (मार्गदर्शक सूचना)

जलसंजीवन मंत्र

तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या.

निसर्गदत्त पेयांचा वापर करा: लिंबू सरबत, ताक, शहाळ्याचे पाणी, आमसूल सरबत आणि घरगुती पन्हे शरीरातील ओलावा टिकवून ठेवतात.

पोशाख आणि घराबाहेर पडताना काळजी

बाहेर पडताना नेहमी सुती, हलके आणि पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे कपडे घाला.

डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी गॉगल्स वापरा.

शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत घराबाहेर पडणे टाळा.

आहारातील बदल

प्रथिनयुक्त आहार आणि मांसाहार उन्हाळ्यात कमी करावा, कारण तो पचायला जड असतो.

बाहेरील उघड्यावरचे पदार्थ किंवा शिळे अन्न खाणे टाळा.

अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड कोल्ड ड्रिंक्स टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी कमी होते.

घराचे व्यवस्थापन

दुपारच्या वेळी खिडक्यांना पडदे लावून ठेवा. रात्री हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा.

घरातील वृद्धांची आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्या.

सामाजिक जबाबदारी

आपण आपल्यासोबतच मुक्या प्राण्यांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. घराबाहेर किंवा बाल्कनीत पक्ष्यांसाठी पाण्याचे भांडे ठेवा. पाळीव प्राण्यांना सावलीत बांधा आणि त्यांना पुरेसे पाणी द्या.

लक्षात ठेवा: उन्हाळ्याची ही तीव्रता केवळ निसर्गाचा कोप नसून वाढते औद्योगिकीकरण आणि जंगलतोडीचा परिणाम आहे. स्वतःचे रक्षण करण्यासोबतच पर्यावरणाचे रक्षण करणे, हेच उन्हाळ्यावरील कायमस्वरूपी उत्तर आहे.

आपत्कालीन संपर्क: तब्येत बिघडल्यास वेळ न घालवता जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधा किंवा १०८ या हेल्पलाईनवर रुग्णवाहिकेसाठी कॉल करा.

सावध राहा, सुरक्षित राहा आणि उन्हाळ्याचा सामना धैर्याने करा!

प्रविण डोंगरदिवे
उपसंपादक
विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ऍक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

सौ. शीतल मापारी पुरस्काराने सन्मानित

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

लोणार/डॉ. अनिल मापारी

लोणार तालुक्यातील शारा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,येथील उपक्रमशील शिक्षिका सौ.शीतल ज्ञानेश्वर मापारी यांना ''किल्ले पर्यटन महोत्सव फाउंडेशन महाराष्ट्र, छत्रपती संभाजी नगर'' यांच्यातर्फे छत्रपती संभाजी महाराजांची भूमीत कला ,संस्कृती आणि सामाजिक कार्याचा गौरव करणारा एक भव्यदिव्य सोहळा दिनांक २५ एप्रिल २०२६ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांमध्ये समाजसाठी राष्ट्रासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा व संस्थांचा भव्य कौतुक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. ह्याप्रसंगी मा. रमेश अगरवाल सुप्रसिद्ध अभिनेते हिंदी भाषेतील चित्रपट जयदेव (२००१) मा. दिलीप घेवंदे श्रेष्ठ अभिनेते, निर्माता यांच्या शुभहस्ते तद्वत ज्येष्ठ अभिनेत्री

लिना पंडित चित्रपट व मालिका कलाकार यांच्या शुभहस्ते स्टार ग्लोबल पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते हया सोहळ्यामध्ये करण्यात आले.

सौ .शीतल ज्ञानेश्वर मापारी यांना विविध क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करीत असल्याने ह्या संमेलनात ''ग्लोबल स्टार टीचर्स अवॉर्डने'' सन्मानित करण्यात आले. मापारी मॅडम यांना यापूर्वी देखील त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल विविध पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे त्यांचे विविध उपक्रम त्यांच्या शीतल मापारी यूट्यूब चैनलवरती आपल्याला बघायला मिळतात. नाविन्यपूर्ण उपक्रम, हसत खेळत शिक्षण, कृतीयुक्त शिक्षण, चला शिकूया प्रयोगातून विज्ञान असे एक ना अनेक उपक्रम त्या सातत्याने राबवत असतात; त्यातून विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे.

पाठ्यक्रमावर आधारित क्यूआर कोड निर्मिती असेल, डिजिटल शिक्षण असेल ज्ञान रचनावादी शिक्षण तसेच भविष्यवेधी शिक्षणाचा ध्यास त्यांनी घेतलेला आहे. शिक्षकांच्या वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये त्यांनी क्रमांक प्राप्त केलेले आहेत . आतापर्यंतच्या कार्यकाळात अनेक असे उपक्रम त्यांनी राबवले जे राज्यस्तरावर ला गेलेले आहेत .नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये देखील त्यांचे उपक्रम निवडल्या गेलेले आहेत; यामधून त्यांच्याकडून बरेचसे भरीव कार्य घडलेले आहे. लोकप्रबोधनात्मक कार्य. लोकसहभागातून गावात सामाजिक समस्यावर आधारित बोलकया भिंती त्यांनी निर्माण केलेल्या आहेत.

कोरोना काळामध्ये गल्लीबोलांमध्ये, रस्त्यांवरती विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन फळे यांची देखील त्यांनी स्वखर्चातून निर्मिती केलेली आहे. अशी एक ना अनेक उपक्रमातून त्यांच्या समाज विधायक, राष्ट्रोन्नतीसाठी प्रेरणादायी बहुमोल कार्य करीत असल्यामुळे त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

संतोष देशमुखांच्या पत्नीचा पराभव, मस्साजोगच्या निवडणुकीत उलटफेर!

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

बीड/प्रतिनिधी : बीडच्या केज तालुक्यातील मसाजोग येथील ग्रामपंचायतच्या सरपंच पदासाठी मतदान प्रक्रिया पार पडली होती. या निवडणुकीमध्ये ८४ टक्के मतदान झाले असून आज सकाळी दहा वाजल्यापासून तहसील कार्यालयात मतमोजणी पार पडली आहे. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर सरपंच पद रिक्त झाले होते. त्यानंतर ही निवडणूक झाली असून यामध्ये आश्विनी देशमुख यांच्यासमोर स्वरूपानंद देशमुख यांनी आव्हान निर्माण केलेले होते.

आज झालेल्या मतदानात गावातील २ हजार ८४ मतदारांपैकी १ हजार ७४४ मतदारांनी आपला हक्क बजावला. आता समोर आलेल्या निकालानुसार संतोष देशमुखांच्या पत्नी आश्विनी देशमुख यांचा पराभव झाला असल्याची माहिती समोर आली आहे. मस्साजोग ग्रामस्थांनी स्वरूपानंद देशमुख यांना कौल दिला आहे. ९२ मतांनी स्वरूपानंद देशमुख विजयी झाले आहेत. तर दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा पराभव झाला आहे.

मेहकर-रिसोड मार्गावर अवैध वाहतूक जोमात

प्रवाशांचा जीव धोक्यात, प्रशासनाचे दुर्लक्ष की हप्तेखोरी?

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

मेहकर/अनिल राठोड :

मेहकर ते रिसोड मार्गावर सध्या अवैध प्रवासी वाहतुकीने कळस गाठला असून, प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः काळी-पिवळी टॅक्सी आणि इतर खाजगी वाहनांमधून क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक केली जात असल्याचे चित्र २९ एप्रिल रोजी स्पष्टपणे दिसून आले. या गंभीर प्रकाराकडे पोलीस प्रशासन आणि उपप्रादेशिक परिवहन विभाग डोळेझाक करत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

एसटी बंद असल्याचा गैरफायदा सध्या या मार्गावर रस्त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. खराब रस्त्याचे कारण पुढे करत एसटी महामंडळाने ग्रामीण भागातील अनेक फेऱ्या बंद ठेवल्या आहेत. याचाच गैरफायदा अवैध वाहतूकदारांनी घेतला आहे. प्रवाशांना पर्याय नसल्याने त्यांना नाईलाजास्तव गच्च भरलेल्या वाहनांमध्ये लटकून प्रवास करावा लागत आहे अवैध वाहतूक इतक्या उघडपणे सुरू असतानाही पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. यामुळे ''मोठा अपघात झाल्यावरच प्रशासनाला जाग येईल का?'' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या दिरंगाईमागे वाहतूक विभागाची हप्तेखोरी कारणीभूत असल्याची चर्चाही प्रवाशांमध्ये जोर धरत आहे.ग्रामीण भागातील बंद असलेली एसटी बस सेवा त्वरित पूर्ववत करण्यात यावी. नियम धाब्यावर बसवून क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरणाऱ्या वाहनांवर कडक दंडात्मक कारवाई व्हावी. रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करून वाहतूक कोंडीतून सुटका करावी. जर वेळीच या अवैध वाहतुकीवर चाप बसवला नाही, तर एखाद्या मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. याला जबाबदार कोण? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

माती परीक्षणामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांची अचूक माहिती मिळते व त्यानुसार खतांचा वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ शक्य : डॉ.नरेश शेजवळ

वडजी येथे शेतकरी बांधवांसाठी माती परीक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

मलकापुर : येथील शेतकरी बांधवांसाठी माती परीक्षणाविषयी जनजागृती आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने मलकापूर तालुका शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने ग्राम वडजी येथे आयोजित करण्यात आलेली माती परीक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत परिसरातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यशाळेदरम्यान तज्ज्ञांनी माती परीक्षणाचे महत्त्व, योग्य पद्धतीने मातीचा नमुना कसा घ्यावा, त्याचे प्रयोगशाळेत विश्लेषण कसे केले जाते तसेच अहवालाच्या आधारे खत व्यवस्थापन कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष माती परीक्षणाचा डेमो दाखवण्यात आला, ज्यामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष समजण्यास मदत झाली.

या प्रसंगी डॉ. नरेश शेजवळ, शभारत सर व प्रशांत तळोले यांनी शेतकऱ्यांना

माती परीक्षणाचे महत्त्व, शेतीतील संतुलित खत व्यवस्थापन तसेच उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

तज्ज्ञांनी सांगितले की, माती परीक्षणामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांची अचूक माहिती मिळते व त्यानुसार खतांचा वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होते. तसेच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी माती परीक्षण अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेच्या शेवटी शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांनी अशा उपयुक्त उपक्रमांचे स्वागत करत भविष्यातही अशा कार्यशाळा आयोजित करण्याची मागणी केली. माती परीक्षण ची सुविधा नाममात्र शुल्का मध्ये आपल्या कंपनीच्या कृषी केंद्र, चंदन नगर मलकापूर ग्रामीण येथे उपलब्ध करण्यात आलेली असून सर्व शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा.असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक मलकापूर तालुका शेतकरी उत्पादक कंपनीचे पदाधिकाऱ्यांचे आणि सहकार्य करणाऱ्या सर्व वडजी ग्राम वासियांचे सर्वांचे आभार मानण्यात आले.

माती परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन केल्यास पिकांना आवश्यक तेवढेच पोषण मिळते त्यामुळे पिकांची वाढ सशक्त होतं आणि १० ते २० टक्क्यापर्यंत उत्पादन वाढ दिसून येते. माती परीक्षणामुळे योग्य प्रमाणात खत वापरल्यास २० ते ४०% पर्यंत खर्चात बचत होऊ शकते मातीतील सामू संतुलित ठेवणे, क्षार कमी करणे आणि सेंद्रिय कर्बा चे प्रमाण वाढवणे या बाबींमध्ये माती परीक्षणाची महत्त्वाची भूमिका असते म्हणून आपल्या जमिनीची माती परीक्षण करून घेणे गरजेचे आहे.

– सौ.ज्योत्स्ना तळोले, अध्यक्ष

प्रियांश आर्याचा षटकार लागल्यानं स्टँडमधील चाहता जखमी, चेहला झाला रक्तभंबाळ

मुल्लानपूर : २८ एप्रिल रोजी मुल्लानपूर इथं पंजाब किंग्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना झाला. राजस्थान रॉयल्सनं हा सामना ६ गडी राखून जिंकला, ज्यामुळं आयपीएल २०२६ मध्ये पंजाबचा हा पहिला पराभव ठरला. मात्र, पंजाब किंग्स अजूनही १३ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. दरम्यान, पंजाब-राजस्थान सामन्यातील एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यात मैदानाच्या स्टँडमध्ये बसलेला एक व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत दिसत आहे. खरं तर, पंजाब किंग्सचा सलामीवीर प्रियांश आर्यानं राजस्थान रॉयल्सविरुद्ध एकमेव षटकार मारला आणि तो षटकार थेट स्टँडम धील एका चाहत्याच्या अंगावर जाऊन पडला. प्रियांश आर्याच्या षटकारानं स्टँडमध्ये बसलेला एक चाहता गंभीर जखमी झाला. त्याच्या चेहऱ्यावर जखम झाली आणि त्यातून प्रचंड रक्तस्त्राव होत होता. हे पाहून उपस्थित लोकांनी लगेचच त्याला मदत केली. राजस्थानविरुद्ध प्रियांश आर्या ११ चेंडूंमध्ये २९ धावांवर बाद झाला. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागनं नाणेफेक जिंकून पंजाब किंग्सविरुद्ध प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना पंजाबनं २० षटकांत ४ गडी गमावून २२२ धावा केल्या. मार्कस स्टोइनिसनं पंजाबसाठी सर्वाधिक ६२ धावा केल्या आणि तो नाबाद राहिला.

सेवा हक्क दिनानिमित्त उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांचा सन्मान

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

साखरखेर्डा/असलम अंजुम

सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सिंदखेडराजा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे व महसूल सहाय्यक श्रीमती भंडारी यांचा जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. हे सिंदखेडराजा उपविभागा करीता कौतुकास्पद आहे

सिंदखेडराजा उपविभागामध्ये महसूल विभागामार्फत देण्यात येणाऱ्या जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेयर दाखले या सेवा सेवा हक्क अधिनियमानुसार निर्धारित वेळेत व गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आल्या. सन २०२५ - २६ या कालावधीत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला. या कालावधीत उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी श्रीमती भंडारी यांनी गतवर्षात एकूण१९ हजार ८५० दाखले वेळेत वितरित केले. वेळेत सेवा देण्याचे प्रमाण सर्वाधिक राहिल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेयर दाखले हे सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे दस्तऐवज असून, शैक्षणिक प्रवेशासाठी त्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. हे दाखले वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे काही विद्यार्थ्यांना तातडीची गरज भासल्यास प्रा. खडसे यांचेशी थेट संपर्क साधणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपच्या माध्यमातूनही प्रमाणपत्र उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनीही प्रत्यक्ष भेटून त्यांचे अभिनंदन केले. तसेच भटक्या-विमुक्त जातीतील नागरिकांसाठी शिबिरांच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रे संकलित करून दाखले वितरित करण्यात आले. पारधी वेड्यावर सामाजिक दातृत्व योजनेअंतर्गत नागरिकांना जातीचे प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आली.

हा सन्मान स्वीकारताना प्रा. संजय खडसे यांनी सांगितले की, ''हा पुरस्कार सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणाऱ्या कार्याचा गौरव आहे. भविष्यातही याच पद्धतीने सेवा देत राहू.''

या कार्यक्रमास जिप चे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सदाशिव शेलार,उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड तसेच सर्व उपविभागीय अधिकारी व उपजिल्हाधिकारी उपस्थित होते.

Short न्यूज

सततची नापिकी व कर्जबाजारी पणाला कंटाळून तरुण शेतकऱ्याची गळफास लावून आत्महत्या

मलकापुर: तालुक्यातील ग्राम घीर्णी येथील युवा शेतकरी दीपक प्रताप सिंग चव्हाण वय ३६ वर्ष यांनी सततची नापीकी, कर्जबाजारी पणाला कंटाळून दि. २८ एप्रिल २६ रोजी दुपारी १२.४० मिनिटांनी आपल्या घरासमोरील जांभळाच्या झाडाला फाशी घेऊन आपली जीवन यात्रा संपवली. सदर प्रकार त्यांच्या पत्नीच्या निदर्शनात आला असून तिने आरडा ओरड केली शेजारीपाजारी जमा झाले त्याला मृत अवस्थेतच खाली काढण्यात आले, दीपक यांच्याकडे एकूण तीन एकर शेती होती शेती पिकत नसल्याने त्याने आपली शेती ठोक्याने गावातील एका व्यक्तीला दिली होती, दीपक हा कर्जबाजारी पणाला कंटाळला होता,त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई, भाऊ, बहीनी असा आप्त परिवार आहे अशा प्रकारची तक्रार त्यांचे चुलत भाऊ संदीप सिंग चव्हाण यांनी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला दाखल केली असून मर्ग दाखल करण्यात आला अधिक तपास मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे मुळे व तडवी करीत आहे संध्याकाळी घीर्णी येथील स्मशानभूमी मध्ये त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मोदी जगाचे नेते; उद्या अंतराळात राजकारण सुरू झालं तर ते तिथेसुद्धा नेते होतील- संजय राऊत

पुणे : आज पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडत आहे. याबाबत शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांना विचारलं असता ते म्हणाले की, साम, दाम, दंड, भेद यापेक्षा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह दहशतवाद, प्रशासनाचा आणि निवडणूक आयोगाचा दहशतवाद सुरू असून, ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांना फायदा व्हावा म्हणून दहशतवादाचा अवलंब करीत आहे. मोदीजी हे जगाचे नेते असून, उद्या अंतराळात राजकारण सुरू झालं तर ते तिथेसुद्धा नेते होतील, अशी जोरदार टीका यावेळी त्यांनी केली.

आम्हाला पक्षाची ताकद वाढवायचीय : पुण्यात आज शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. शिवसेना नेते संजय राऊत म्हणाले की, पुणे महानगरपालिकेत आमच्या पक्षाचा एक नगरसेवक असून, आम्हाला पक्षाची ताकद वाढवायची आहे. आज महापालिकेतील पक्ष दालनाचे उद्घाटन होत आहे. आम्ही आमच्या पक्षाची ताकद येत्या काळात वाढवणार आहोत. तसेच पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी सारखं खंबीर नेतृत्व असताना तिच्या पराभवासाठी २.५० लाखांची फौज मोदी आणि शाह यांच्याकडून नेण्यात आली, असंही यावेळी त्यांनी सांगितलंय.

भरधाव कारचे टायर फुटल्याने भीषण अपघात, लग्नापूर्वीच तरुणीवर काळानं घाला घातला, दोन जणींचा मृत्यू, तर दोन भाऊ गंभीर

जळगाव :जळगावच्या पाचोरा तालुक्यातील महादेवाचे बांबरुड येथे भरधाव कारचे टायर फुटल्याने भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या भीषण अपघातात साखरपुडा झालेल्या तरुणीसह तिच्या वहिनीचा जागीच मृत्यू तर दोघे भाऊ गंभीर जखमीझाले आहेत. शिखा विनायक बेलसरे असे साखरपुडा झालेल्या मयत तरुणीचे तर मीना मानकर तिच्या मयत वहिनीचे नाव आहे.

या घटनेत तरुणीचे दोन्ही भाऊ देखील जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. शिखा बेलसरे हिचा रोजी २१ एप्रिलला साखरपुडा झाला होता, ८ मे ला लग्न होतं, मात्र लग्नापूर्वीच काळाने घाला घातला.वणी येथे सप्तशृंगी गडावर लग्नाची पत्रिका ठेवून परतत असताना बांबरुड येथे कारचे टायर फुटल्यानंतर कार रस्त्याखाली उतरून कार झाडावर आढळल्याने अपघात झाला आहे.

वाशिम जिल्ह्यात भीषण अपघाताची धक्कादायक घटना

वाशिम जिल्ह्यात भीषण अपघाताची धक्कादायक घटना घडली आहे. वाशिम वरुन छत्रपती संभाजी नगर ते नागपूर या जुन्या महामार्गावर अपघाताची घटना समोर आली आहे. वाशिम च्या कारंजा तालुक्यातील शेवदी फाट्यावर भरधाव कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटून कंटेनर रस्त्याच्या कडेला उलटून अपघात झाला आहे. या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. कंटेनर चालक खाली दबल्याने त्याचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा कंटेनर जालन्यावरुन कारंजा कडे येत होता. या अपघाताची माहिती मिळताच बचाव पथकाने कंटेनर खाली दबून असलेल्या चालकाला क्रेनच्या साह्याने बाहेर काढूले. सुनील विष्णू पवार (वय ४८) रा. सोनोशी तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा असे अपघातात मृत्यू झालेल्या चालकाच नाव आहे.

मध्यरात्रीच्या आगीने वढव गावात हाहाकार

अनेक कुटुंबांचे लाखो रुपयांचे नुकसान, लोणार तालुक्यातील घटना

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

लोणार/डॉ. अनिल मापारी
लोणार तालुक्यात वढव येथे २८ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीमुळे अनेक शेतकरी कुटुंबांचे संसार अक्षरशः राख रांगोळी झाली आहे. विविध ठिकाणी लागलेल्या या आगीमध्ये अन्नधान्य, शेतीमाल, घरातील साहित्य आणि राहत्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, पंचनाम्यानुसार लाखो रुपयांची हानी झाल्याची नोंद करण्यात आली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी अनेक कुटुंबे बेघर झाली आहेत.

प्रमुख नुकसानग्रस्त कुटुंबे व नुकसानाचा आढावा

सुभाष आश्रु सोसे
अंदाजे नुकसान: ₹१९,२०,०००
सोयाबीन, हरभरा, तूर, गहू, कांड्यासह मोठ्या प्रमाणात शेतीमाल जळून खाक. घर व संसारोपयोगी साहित्याचे नुकसान.

सदाशिव अंबादास सोसे
अंदाजे नुकसान: ₹१३,९५,०००
सोयाबीन, हरभरा, तूर, गहू यांसह अन्नधान्य व घराचे मोठे नुकसान.

बद्रीनाथ रामभाऊ सोसे
अंदाजे नुकसान: ₹१९,०५,०००
तूर, हरभरा, गहू, सोयाबीन तसेच घरातील साहित्य पूर्णतः जळाले.

रमेश आश्रु सोसे
अंदाजे नुकसान: ₹५,८५,०००
घरातील अन्नधान्य, वस्तू व इमारतीचे नुकसान.

कडुजी सखाराम सोसे
अंदाजे नुकसान: ₹२६,६५,०००
तूर, हरभरा, गहू, कांड्यासह मोठ्या प्रमाणावर शेतीमाल व घराचे नुकसान.

पुष्पा महादु सोसे
अंदाजे नुकसान: ₹१८,४५,०००
घरातील धान्य, संसारोपयोगी साहित्य व घर जळाले.

शालुबाई दिलीप सोसे
अंदाजे नुकसान: ₹२,३०,०००
अन्नधान्य, घरगुती साहित्य व घराचे नुकसान झाले आहे

पंचनामा पूर्ण करून प्रशासनाकडे मदतीची मागणी करण्यात आली आहे. २९ एप्रिल २०२६ रोजी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसह पंचांच्या उपस्थितीत सर्व घटनांचा पंचनामा करण्यात आला. प्राथमिक अंदाजानुसार एकूण नुकसान कोट्यवधी रुपयांच्या घरात पोहोचले आहे. बाधित कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत देऊन पुनर्वसन करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण
अचानक लागलेल्या आगीच्या या मालिकेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत अशा घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

या भीषण आगीत अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, शासनाने तातडीने मदत देऊन त्यांना दिलासा देणे अत्यंत गरजेचे आहे.अशी मागणी मा सभापती डॉ प्रदीप मोरे व संचालक युवराज सोनुने यांनी शासनाकडे केली आहे. पंचनामा तलाठी दिगंबर गावंडे यांनी केला आहे यावेळी लोणार मेहकर रिसोड या ठिकाणी अग्निषमक वाहनांना पाचारण करण्यात आले होते व गावकऱ्यांनी सुद्धा आग विझवण्यासाठी परा कष्टा केली फोटो पंचनामा करताना डिगांबर गावंडे , व आग लागल्यानंतर आगीचे विदारक दृश्य

Short न्यूज

पुण्यात दहशत कायम; भाजप कार्यकर्त्यावर ९ राऊंड फायर

मावळ : पुण्याची वाढती गुन्हेगारी आता पुणेकरांसाठी धोक्याची घंटा बनत चालली आहे. गुंडांची दहशत मोठ्या प्रमाणात पुण्यात पसरत चालली आहे, त्यामुळे कायद्याचा धाक कुठे गेला? असे प्रश्न नागिरकांमध्ये पसरले आहेत. एका भाजप कार्यकर्त्याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मावळच्या देहूरोडमध्ये भाजप कार्यकर्त्यावर हल्ला करण्यात आला रमेश रेड्डी असेमृत कार्यकर्त्याचे नाव आहे, अज्ञात लोकांकडून रमेश यांच्यावर हल्ला करण्यात आला आणि यात रमेश यांच्यावर ९ राउंड फायर करण्यात आले. यातील एक गोळी रमेश रेड्डी यांच्या डोक्यातून आरपार गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. रात्री झालेल्या या गोळीबारामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, त्या हत्याकांडामुळे परिसरात मोठा तणाव निर्माण झाला आहे.

पुण्यात नाकाबंदी

रमेश रेड्डी यांच्या अशा जाण्याने नातेवाईक आणि मित्र परिवारात पोकळी निर्माण झाली असून नातेवाईकांनी आक्रोश जाहीर करत काही काळ जुना मुंबई उणे महामार्गावर रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाचा पंचनामा केला जात असून, शहरात नाकाबंदी लागू करण्यात आली आहे.

दैवी शक्तीचा वास असल्याचं भासवून महिलेवर अत्याचार

पुण्यामधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्यातील स्वारगेट परिसरात एका भोंदूबाबानं चक्क अंगात देवी शक्ती असल्याचं भासवून एका विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही कौटुंबिक वादामुळे पतीपासून वेगळी राहत होती. तिच्या याच मानसिक परिस्थितीचा आणि असहायतेचा फायदा आरोपी औदुंबर गडदे यानं घेतला.

भीषण अपघातात नववधूसह तिघांचा दुर्दैवी अंत; वऱ्हाड घेऊन निघालेल्या कुटुंबावर कोसळला दु:खाचा डोंगर

जळगाव : जळगाव जिल्ह्यातुन एक भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. जळगाव जिल्ह्याच्या धरणगावमध्ये एक अतिशय हृदयद्रावक अपघाताची घटना घडली आहे. धरणगाव तालुक्यातील वराडखुर्दजवळ महामार्गावर टायर फुटल्याने भीषण कार अपघात झाला असून लग्नाहून परतणाऱ्या क्रूझर गाडीला टँकरवर धडक बसली, यात नववधूसह ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जण गंभीर जखमी झाले असून एका लहान मुलाची प्रकृती चिंताजनक आहे. आनंदाच्या क्षणावर अशाप्रकारे विरझन पडल्याने परिसरातून हळहळ व्यक्त आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातच्या वापी येथून लग्नाचं वऱ्हाड घेऊन अकोला येथे ही क्रूझर कार जात होती. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील वराडखुर्द जवळ महामार्गावर असतानाच या धावत्या क्रूझर कारचं टायर अचानक फुटलं आणि ही कार त्या रोडलगत उभ्या गॅस टँकरवर जाऊन धडकली. अतिशय भीषण अशी ही धडक होती. लग्न झाल्यानंतर नववधूला परत घेऊन येताना जळगाव मधील वराड गावाजवळ हा अपघात घडला आहे. यामध्ये तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, जिचं नुकतंच लग्न झालं अशा नववधूचाही मृतांमध्ये समावेश असून त्यामुळे सगळेच हळहळले.

नववधूच्या हाताची मेहंदीही सुकली नव्हती, आता कुठे संसाराची स्वप्ने रंगू लागली होती आणि अशाप्रकारे अपघात नववधूचा दुर्दैची अंत झाला. या अपघातात नववधू पूजा रवी वाघळकर, दत्तू भागवत, जगदीश वाघळकर अशी अपघातात मृत झालेल्यांची नावे असून तिघेही एकच कुटुंबातील असल्याची माहिती समोर आली आहे. तर या अपघातात आणखी ६ जण जखमी असून लहान मुलाची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

कलिंगड खाल्लं अनब एकाच कुटुंबातील ४ जणांचा मृत्यू; दुकानदारानेच सांगितलं सत्य

मुंबई : बिर्याणी त्यानंतर थंडावा मिळावा म्हणून खाल्लेलं कलिंगड आणि थेट मृत्यू किती भयंकर आहे ना हे, मुंबईतील मज्जीद बंदर नजीकच्या पायधुनी परिसरात असाच काहीसा प्रकार घडला आणि एकाच कुटुंबातील चार जणांना आपले प्राण गमवावे लागले, निमित्त ठरलं ते रात्री खाल्लेलं कलिंगड. मृतांच्या शरीरात पेनकिलर सदृश्य पदार्थ आढळल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. असा पदार्थ आढळला आहे याबाबत रुग्णालयाने कोणताही दावा केलेला नाही. या नळ बाजारात डोकडिया या,कुटुंबियांने आमच्याकडून कलिंगड जरी खरेदी केले असले तरी आमच्या आमच्या कलिंगडमध्ये कोणताही दोष नाही आहे.

इथून हजारो लोक कलिंगड घेऊन जातात, परंतु एकाच देखील मृत्यू झाला किंवा तब्येत बिघडली आहे अशी कोणी तक्रार केलेली नाही. या प्रकरणात आमची काही चूक नसताना उगाचच आमच्यावर आरोप केले जात आहेत तसेच पोलीस माझ्या मुलाची कसून चौकशी करत आहेत. कलिंगड खाल्ल्याने मृत्यू होतो अशी भीती बाजारात पसरल्याने कोणीही एकही कलिंगड विकण्यास बाहेर काढत नाही आहे. दुकानदार म्हणाला की आमच्या इथे पोलीस चौकशीसाठी आले होते, परंतु आमच्या यात काहीही दोष नाही आहे तसेच आम्हाला देखील त्या कुटुंबाबद्दल वाईट वाटत आहे, म्हणून आम्ही पोलिसांना पूर्णपणे सहकार्य करणार असे दुकानदाराने सांगितले आहे.

अचली ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सौ.उषा भानुसे विजयी

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

साखरखेर्डा/असलम अंजुम
सिंदखेड राजा तालुक्यातील अचली ग्रामपंचायतच्या सरपंचपदासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत सौ. उषा सुखदेव भानुसे ह्या विजयी झाल्या असून त्यांच्या गटाचे दोन सदस्यही निवडून आले आहेत.

थेट जनतेतून निवडून आलेल्या सौ. उषा सुखदेव भानुसे आणि तत्कालीन सरपंच सौ. सोनाली चरणसिंग लखवाळ (राजपूत) आणि एका सदस्याने राजीनामा दिला होता. तसेच एक सदस्य मयत झाल्याने या रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली. त्यात सौ. सोनाली चरणसिंग लखवाळ आणि समाधान सिद्धार्थ लिहिणार हे दोन सदस्य म्हणून अविरोध निवडून आले होते. मात्र सरपंचपदासाठी सौ. मंदा प्रकाश लिहिणार यांच्यात सरळ लढत झाली. दि. २८ एप्रिल रोजी झालेल्या मतदानात एकूण १ हजार ४६९ मतदारांपैकी १ हजार ६६ इतके मतदान झाले होते.

आज त्याचे निकाल लागले असून सौ. उषा सुखदेव भानुसे यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवार सौ. लिहिणार यांचा तब्बल ३५३ मतांनी पराभव करत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

दाताळा ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार; ५ महिने उलटूनही नागरिक नळ कनेक्शनपासून वंचित

ऐन उन्हाळ्यात पाणी टंचाईचा चटका पैसे भरूनही नागरिकांवर वणवण भटकण्याची वेळ

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

मलकापुर : दाताळा येथील ग्रामपंचायत प्रशासनाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. गावातील नागरिकांनी नळ कनेक्शनसाठी अधिकृत अनामत रक्कम भरून पाच महिने उलटले, तरी अद्याप त्यांना पाणी मिळालेले नाही. एकीकडे पारा ४० अंशांच्या पार गेला असताना, दुसरीकडे हक्काचे पाणी मिळत नसल्याने नागरिकांना खाजगी विहिरींवरून पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.

दाताळा-उमाळी रोड परिसरातील रहिवासी मोहन नंदकिशोर पाटील यांनी ५ महिन्यांपूर्वी ग्रामपंचायत कार्यालयात नळ कनेक्शनसाठी १,८०० रुपये (१००० रु. अनामत व ८०० रु. पाणीपट्टी) अधिकृत पावतीद्वारे भरले होते. (पावती क्र. ०९, दिनांक २६/११/२०२५). मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही ग्रामपंचायत प्रशासनाने अद्याप त्यांना नळ जोडून दिलेले नाही. पैसे भरूनही केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे या कुटुंबाला भर उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

काही दिवसांपूर्वीच दाताळा येथील इंदिरा नगर भागात महिनाभर पाणी नसल्याने संतप्त महिलांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते. त्या घटनेतून बोध घेण्याऐवजी ग्रामसेवक आणि सरपंच अद्यापही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे चित्र आहे. प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे गावातील अनेक नागरिक हक्काच्या पाण्यापासून वंचित असून, त्यांच्यात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

आम्ही नियमानुसार सर्व कर आणि अनामत रक्कम भरली आहे, तरीही आम्हाला पाण्यासाठी इतरांच्या विहिरींचा आधार घ्यावा लागतो,'' अशी कैफियत बाधित नागरिकांनी मांडली आहे. प्रशासनाने जर लवकर हा प्रश्न मार्गी लावला नाही, तर इंदिरा नगरमधील नागरिकांप्रमाणेच आता या भागातील रहिवाशांनाही उपोषण किंवा तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

प्रशासनाने नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. पाणी हा मूलभूत हक्क असून, तो वेळेत मिळणे गरजेचे आहे. अन्यथा येणाऱ्या काळात आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही.

दोनशे करूनही पंजाबची हाराकिरी! आरसीबीच्या नावावर असलेला नकोसा पराक्रम आता पंजाबच्या खात्यात

मुंबई/प्रतिनिधी : आयपीएल २०२६ च्या ४०व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्सला ६ गडी राखून पराभूत केले. या पराभवामुळे, आयपीएलमध्ये २०० किंवा त्याहून अधिक धावांचा बचाव करताना सर्वाधिक पराभव पत्करणारा संघ म्हणून पंजाब ओळखला जाऊ लागला. राजस्थानने आपल्या कारकिर्दीतील तिसरा सर्वात मोठा धावांचा पाठलाग केला. डोनोव्हान फरेराने १०५ मीटर लांब षटकार मारला.

१. राजस्थान रॉयल्सचा सर्वात मोठा विजय

राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्सविरुद्ध २२३ धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पूर्ण केले. आयपीएलमध्ये लक्ष्याचा पाठलाग करताना संघाचा हा तिसरा सर्वात मोठा विजय आहे. राजस्थानने २०२० मध्ये शारजाह येथे पंजाबविरुद्ध २२४ धावांचे सर्वोच्च लक्ष्य गाठले होते. दुसरा सर्वात मोठा विजय २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध आहे.

२. २०० किंवा अधिक धावांचा बचाव करताना पंजाबचे सर्वाधिक पराभव

आयपीएलमध्ये २०० किंवा अधिक धावांचा बचाव करताना सर्वाधिक पराभवांचा विक्रम पंजाब किंग्सच्या नावावर आहे, अशा सामन्यांमध्ये त्यांना आठ पराभव पत्करावे लागले आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळूर दुसऱ्या स्थानावर आहे, ज्यांनी २००+ धावांचा बचाव करताना सात वेळा सामना गमावला आहे.